आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
८ नोव्हेंबर २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेचं हिवाळी अधिवेशन येत्या १ डिसेंबर पासून सुरु होणार

- वंदे भारत, नमो भारत आणि अमृत भारत सारख्या गाड्या भारतीय रेल्वेच्या भवितव्याचा पाया घालत आहेत, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- बिहार विधानसभा निवडणुकीचा प्रचार अखेरच्या टप्प्यात

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून अंगोला आणि बोत्सवाना या 2 देशांच्या दौऱ्यावर

**आणि**

- भारत-ऑस्ट्रेलिया टी २० क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि शेवटचा सामना आज ब्रिस्बेनमधे रंगणार

**<><><><><>**

संसदेचं हिवाळी अधिवेशन येत्या १ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे ही माहिती दिली. १९ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनात लोकशाही बळकट करणं आणि सामान्य नागरिकांच्या आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीनं विधायक चर्चा व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज वाराणसी इथं चार वंदे भारत गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. यात वाराणसी-खजुराहो, लखनौ-सहारानपूर, फिरोजपूर-दिल्ली, आणि एर्नाकुलम-बंगळुरू या गाड्यांचा समावेश आहे. यामुळे वंदे भारत गाड्यांची संख्या आता १६० झाली आहे.

विकसनशील देशांमधल्या पायाभूत सुविधांचा विकास हा त्या देशाच्या आर्थिक विकासात भर टाकत असतो. रेल्वे आणि रस्ते बनतात तेव्हा विकासाला चालना मिळते, आज भारत देखील विकासाच्या मार्गावर वेगानं जात आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी केलं.

**- - होल्ड बाईट मोदी रेल्वे - -**

वंदे भारत, नमो भारत आणि अमृत भारत सारख्या गाड्या भारतीय रेल्वेच्या भवितव्याचा पाया घालत आहेत, वंदे भारत ही भारतीयांकडून भारतीयांसाठी चालवली जाणारी गाडी असून प्रत्येक नागरिकाला याचा अभिमान आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

बाबा विश्वनाथ धाम आणि अयोध्येतल्या राम मंदिरामुळे उत्तरप्रदेशात पर्यटनाच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. वाराणसीमधे देखील पायाभूत सुविधांचा विकास झपाट्याने होत आहे, असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. याठिकाणी आरोग्य सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्या असून वाराणसी या प्रदेशाची आरोग्य राजधानी बनली असल्याचे गौरवोद्गार मोदी यांनी काढले. यावेळी उत्तरप्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव उपस्थित होते.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याच्या प्रचाराचा उद्या शेवटचा दिवस असल्यामुळे प्रचाराला वेग आला आहे. रालोआ आणि महाआघाडीचे वरिष्ठ नेते आणि स्टार प्रचारकांनी सभा आणि बैठकांचा धडाका लावला आहे. पहिल्या टप्प्यातल्या मतदानात बिहारच्या जनतेनं राओलाचा विजय निश्चित केला आहे, असा विश्वास भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. ते आज सितामढी इथं प्रचारसभेला संबोधित करत होते. ही निवडणूक विकसित बिहार निर्माण करण्यासाठी महत्त्वाची असून यातून येणाऱ्या काळात इथल्या मुलांचं भविष्य ठऱणार असल्याचं ते म्हणाले. प्रधानमंत्र्यांनी बेत्तीया इथल्या प्रचारसभेलाही संबोधित केलं. ज्येष्ठ नेते आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह रोहतस आणि कैमुर जिल्ह्यात सभा घेतील तर गृहमंत्री अमित शहा कटिहार इथल्या प्रचारसभेला संबोधित करणार आहेत. रालोआच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री सुद्धा सभा घेणार आहेत.

**महाआघाडी**च्या उमेदवारांच्या प्रचारासाठी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्या प्रियांका गांधी आज कटिहार इथं दोन प्रचारसभा घेणार आहेत. तर राजद नेते तेजस्वी यादव जमुई, गया, नवादा आणि जेहानाबाद इथं अठरा प्रचारसभा घेणार आहेत. पहिल्या टप्प्यात महाआघाडी ७२ जागांवर विजयी होईल, असा विश्वास काँग्रेस नेता पवन खेडा यांनी आज पाटणा इथं

वार्ताहरांशी बोलताना व्यक्त केला. रालोआच्या घटक पक्षांमधे समन्वयाचा अभाव असल्याचंही ते म्हणाले.

**दुसऱ्या** टप्प्यातल्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर भारत-नेपाळ सीमा उद्या सकाळपासून ११ नोव्हेंबरपर्यंत पूर्णपणे बंद राहील. या परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. या काळात मधुबनी जिल्ह्यातील जयनगर ते नेपाळमधील जनकपूरपर्यंत रेल्वे सेवा देखील बंद ठेवण्यात येणार आहे.

**दरम्यान,** पहिल्या टप्प्यात ६४ पूर्णांक ६६ दशांश टक्के मतदान झालं. दुसऱ्या टप्प्यातलं मतदान ११ नोव्हेंबरला होणार असून १४ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज  अंगोला आणि बोत्सवाना या 2 देशांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. भेटीच्या पहिल्या टप्प्यात त्या अंगोलाच्या अध्यक्षांच्या निमंत्रणावरून अंगोला देशाला भेट देतील. अंगोलाच्या 50 व्या स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमातही त्या सहभागी होतील. तिथल्या भारतीय समुदायाशीही त्या संवाद साधणार आहेत. त्यानंतर 11 नोव्हेंबरला त्या बोत्सवानाला जातील. त्या बोत्स्वानाच्या अध्यक्षांबरोबर द्विपक्षीय चर्चा करतील. तसंच तिथल्या संसदेला संबोधित करतील.

**<><><><><>**

आर्थिक वाढीच्या दराबाबत जागतिक बँकेनं भारताचं कौतुक केलं आहे. जागतिक दर्जाची डिजीटल सेवा हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मजबूत पाया असल्याचं जागतिक बँकेने म्हटलं आहे. तंत्रज्ञानातली क्षमता आणि उत्पादकतेत सुधारणा झाल्याचंही जागतिक बँकेनं म्हटलं आहे. यापुढेही  आर्थिक विकास अधिक वेगानं होण्यासाठी  आर्थिक व्यवस्थापन आणखी मजबूत करायला हवं. आर्थिक क्षेत्रांमधे सुधारणा आणि खाजगी गुंतवणुकीवर भर द्यावा लागेल, असं निरीक्षणही जागतिक बँकेने नोंदविलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेतल्या राज्यांमधे तिथल्या  स्थानिक शासनाच्या मर्जीविरुद्ध सैन्य तैनात करायला राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना न्यायालयाने कायमची मनाई केली आहे. स्थलांतर नियंत्रक अधिकाऱ्यांविरोधातली निदर्शनं रोखण्यासाठी ट्रम्प यांच्या सैन्य तैनातीच्या धोरणाला विरोध करणारा न्यायालयाचा हा पहिलाच निर्णय आहे. याआधी ट्रम्प यांनी

डेमॉक्रॅटिक पक्षाच्या नेतृत्वाखालच्या लॉस एंजलीस, शिकागो आणि वॉशिंग्टन मध्ये सैन्य तैनात करण्याचा प्रयत्न केला आहे.

<><><><>

छत्तीसगढच्या गरियाबंद जिल्ह्यात ७ माओवाद्यांनी शरणागती पत्करली आहे. रायपूरचे पोलीस महानिरीक्षक अमरेश मिश्रा यांच्या समोर आज या ७ जणांनी ६ शस्त्रं खाली ठेवली. त्यांच्यावर एकू ३७ लाख रुपयांची बक्षिसं जाहीर झाली होती.

<><><><>

झारखंडच्या पश्चिम सिंहभूम जिल्ह्यात दाट सारंडा जंगलात माओवादी बंडखोरांशी झालेल्या चकमकीनंतर सुरक्षा दलांना नक्षलविरोधी मोहिमेतलं मोठं यश मिळालं आहे. झारखंड पोलिस आणि केंद्रीय राखीव पोलिस दलांच्या संयुक्त पथकाची काल रात्रीपासून आज पहाटेपर्यंत जराईकेला पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कुलापू बुरू परिसरात माओवाद्यांशी चकमक सुरू होती. दीर्घकाळ सुरू असलेल्या गोळीबारानंतर, सुरक्षा कर्मचाऱ्यांनी आजूबाजूच्या जंगल परिसरात व्यापक शोध मोहीम सुरू केली. यामध्ये शस्त्रास्त्रे, दारूगोळा, स्फोटके आणि माओवादी साहित्याचा मोठा साठा जप्त करण्यात आला. बंडखोर मोठ्या हल्ल्याच्या तयारीत असल्याचं दिसून आलं.

<><><><>

जम्मू काश्मीरमध्ये कुपवाडा जिल्ह्यात केरन सेक्टर इथं सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत काल दोन अज्ञात घुसखोर ठार झाले. काही घुसखोर प्रत्यक्ष नियंत्रणरेषा पार करण्याच्या प्रयत्नात असल्याची खबर मिळताच सुरक्षादलांनी तात्काळ कारवाई केली. घुसखोरांनी केलेल्या गोळीबाराला प्रत्युत्तर देताना झालेल्या चकमकीत दोन जण मारले गेले, असं लष्कराच्या प्रवक्त्यानं सांगितलं. या भागातली कारवाई अद्याप सुरु असल्याचं वृत्त आहे.

<><><><>

छत्तीसगढ मध्ये बस्तर जिल्ह्यात राष्ट्रीय तपास यंत्रणेनं काल १२ ठिकाणी छापे टाकले. दोन वर्षांपूर्वी अरणपूर मध्ये झालेला स्फोट आणि नक्षलवादी हल्ल्यांच्या चौकशीच्या संदर्भात यंत्रणेनं काल ही कारवाई केली. सी पी आय या बंदी घातलेल्या

नक्षलवादी संघटनेशी संबंधित ठिकाणांवर केलेल्या या छापेमारीत काही आक्षेपार्ह कागदपत्रं, डिजिटल उपकरणं आणि इतर साहित्य जप्त करण्यात आलं आहे.

<><><><><>

२०२९मध्ये होणाऱ्या महिला एकदिवसीय विश्वचषकातल्या सहभागी संघांची संख्या ८वरून १०वर न्यायचा निर्णय आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं घेतला आहे. अलीकडे या स्पर्धेला मिळालेल्या यशामुळे हा निर्णय घेतल्याचं आयसीसीनं निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

भारत-ऑस्ट्रेलिया टी २० क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि शेवटचा सामना आज ब्रिस्बेनमधे होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी पावणे दोन वाजता हा सामना सुरू होईल. नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाच्या संघानं प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

भारत या मालिकेत २-१ अशा गुणफरकाने आघाडीवर आहे.

//<><><><><>//